RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# नोकरी करणाऱ्या महिलांच्या भुमिका संघर्ष - एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. प्रमिला मोहिते (हजारे)**
संशोधक विद्यार्थीनी
रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. ज्योती सेलोकर**
मार्गदर्शक
प्राधापक समाजशास्त्र

---

## प्रस्तावना :

आधुनिक युगात महिलांचे सुधारित चाललेली व्यक्तीमत्व त्याचे स्थान जग पाहत आहे. पती पत्नी ही जीवनसाथी दोन चाक आहे. अशी पूर्वापार चालत आलेली कल्पना सत्य असून पतीने आर्थिक बाजू संभाळावी आणि महिलांनी (पत्नीने) त्याचा काटकसरीने योग्य ठिकाणी गरजेनुसार उपयोग करावा अशी कुटुंबव्यवस्था होती, परतु विज्ञानाच्या प्रगतीमुळे औद्योगीकीकरण वाढले नागरीकरण झाले जीवन आधिक सुकर करणा—या वस्तूचे उत्पादन व्हावयास लागले. असे वाटणे स्वाभाविक आहे स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे महिलांच्या ठिकाणी स्वत:च्या पायावर उभे राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. आज अनेक क्षेत्राातील उच्च पदे देखील महिला भुषवित आहेत. महिलामधील या प्रवृत्तीमुळे महीला प्रध्याापकांची (कर्मवाऱ्यांच्या) संस्थेत पुर्वीच्या मानाने बरीच वाढ झाल्याचे आढळते.

महिला शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात आले. शिक्षणामुळे व्यक्ती विकास संस्कार निर्मिती व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यामुळे विविध प्रकारच्या नोकऱ्यांमधून मिळणाऱ्या अधिकारांमुळे आर्थिक समानता मिळते. महिलांच्या शिक्षणाला विशेष प्राधन्य देण्यात आले. आज महिलांच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात आले. महिलांना आर्थिक दृष्टया स्वतंत्र बनविने हा मुलभूत हक्क आहे. नोकरी करणाऱ्या महिलांनी पुरूषाच्यांबरोबरीने अनेक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत असल्याचे सर्वत्र दिसून येत आहे. केवळ अर्थार्जन नये तर राजकारण समाजकारण यातही काही महिला पुरूषांवर मात कडून पुढे आलेल्या आहेत. महिलांच्या राष्ट्रीय उत्पादन कार्यातील सहभाग मोठा असल्यामुळे त्यांना पुरूषांच्या बरोबरीने स्थान प्राप्त झालेले आहे. परंतू भारतामध्ये आजही महिलांची भुमिका दुय्यम स्वरूपाची आहे. कारण महिलांच्या अर्थार्जन कार्याचे कायम असलेले गौण स्थान होय.

## शोध लेखाचे उदिष्टये :

- नोकरी करणाऱ्या महिलांच्या भुमिका जाणून घेणे.
- नोकरदार महिलांच्या समस्या समजून घेणे.
- नोकरीतील महिलांच्या दररोज जिवन जगणाऱ्या संघर्षाच्या अभ्यास करणे.

## शोध लेखांचे गृहितके :

- नोकरी करणाऱ्या महिला अत्यंत खडतर भुमिकांतुन काम करताता.
- नोकरदार महिलांना कुटुंबिक सामाजिक व कार्यालयिन समस्यांना तोंड दयावे लागते.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्याात आला असून स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असुन त्यात प्रकाशित अप्रकासित पुस्तक, मासिके, इटरनेट पेपर, जर्नल, वृत्तपत्रे या पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक व विश्लषणात्मक संशोधन पध्दती उपयोगात आणली आहे.

## नोकरी करणाऱ्या महिलांची भुमिका संघर्ष :

आजच्या स्पर्धात्मक गतिशिल गुतागुंतीच्या जगात वावरतांना नोकरी करीत असलेल्या महिलांच्या बदलत्या भुमिकेमुळे तिला पारंपाररिक कामा व्यतिरिक्त स्वत:ची नोकरी करीत असतांना कामाचा बोजा व कौटुंबिक जबाबदारी पूर्ण करताना जेव्हा नोकरीतील कर्तव्य पुर्ण करीत असतांना तिला कुटुंबीयाची साथ हवी असते परंतू जर ती साथ कुटूंबीयांकडून मिळाली नाही. तर ताण तणाव संघर्ष निर्माण होतो. त्या तुलनेने घरी राहणारी महिला कुटूंबियांच्या सर्व अपेक्षा वेळेची मर्यादा नसल्यामुळे पूर्ण करू शकते. त्यामुळे नोकरी करणारी महिला कमी वेळेत जास्तीत जास्त कामे कशाप्रकारे पूर्ण करून सर्वाना आनंद देता येईल. या प्रयत्नामुळे तिचा ताण वाढत जातो.

एकोणिसाव्या शतकाच्या पुर्वार्धात भारतातील चळवळीने महिलांची बंधनात्मक अवस्था सुधारण्यासाठी प्रयत्न केल्या गेले. याकाळात महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात आली या प्रयत्नामुळे स्त्रिया वैचारिक दृष्टया स्वतंत्र होवू लागल्या त्यांना 'स्व' अस्तीत्वाची जाणीव होवू लागली. महिलांनी शिक्षण घेवून आर्थिकदृष्टया स्वतंत्र व्हावे त्याचे स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करण्या इतपंत ती सक्षम व्हावी. संविधानाने महिलांना दिलेले कायदयांतर्गत संरक्षण आणि शैक्षणिक सामाजिक व आर्थिक विकासाच्या संधी यामुळे महिलांच्या कार्यात आणि भुमिकेत आमूलाग्र परिवर्तन झाले आहे, हे भारतीय समाजातील मुलभुत संरक्षणात्मक परिवर्तन आहे. महिला नोकरी करून सक्षम व स्वतंत्र झाली असली तरी तिच्या समस्याचे (संघर्षाचे) पुर्ण निराकरण झाले नाही.

महिलांना नोकरीमध्ये दुय्यम दर्जा मिळत असल्यामुळे महिलाना 'अ' उमेद होऊन स्वत:च्या लायकीबद्दल शंका घेतात. काही स्त्रिया तर बढत्या अधिकारपदे घेण्याचा स्वत:हून निर्णयही घेत नाहीत. पुरूष व महिलांचे समानतेचे हक्क मतदानापुरतचे मान्य केल्याचे दिसुन येते. कारण विविध क्षेत्रातील यशस्वी स्त्रियांचे तोंड भरून कौतूक करणाऱ्या पुरूषांना स्वत:ची पत्नी मात्र परंपरा प्रिय सेवावृत्तीची असावी असे वाटते. नोकरदार स्त्री यांना विचारले जाते. मुलबाळे कसे सांभाळू शकतां? हे सर्वाचेच निनिक्षण आहे. महिलानी सर्व कामे व्यवस्थित करावे आणि बाहेर नोकरीही करावी अशी

दुहेरी धोरण स्विकारणाऱ्या महिलांना अनेक संघर्षांना तोंड दयावे लागते. त्यामुळे नोकरी करणाऱ्या स्त्रीला अधिक मेहनत करावी लागते. पती पत्नी चे एकच करिअर असले तरी पतीची नोकरी जास्त महत्वाची मानली जाते. पुरूष्याच्या बढतीला प्राधान्य देणाऱ्या नोकरदार महिला आधिक दिसतात. पुरूषांच्या फिरतीच्या नोकरीमुळे महिलांच्या नोकरीत अडथळा निर्माण होते.

महिलांना नोकऱ्यांमध्ये अटी घातल्या जातात जसे एयर होस्टेस सारख्या नोकऱ्यामध्ये विवाह संदर्भात अटी घातल्या जातात. अशा नोकऱ्या स्विकारल्या तरी घरापासून मधुन मधून बाहेर राहावे लागते.कधी कधी दौऱ्यावर ही अधिकाऱ्यासोबत जावे लागते. नोकरी करणाऱ्या महिला दिवसभर काम करूण घरी परततात. घरी येऊन त्यांना गृहकृत्ये पार पाडावीच लागतात. त्यामुळे त्या थकुन जातात. पुरूषांनी आपल्या कामात सहकार्य करावे अशी तिची भावना असते परंतू तसे घडत नाही. कारण सामाजिक धारणे प्रमाणे पतीचे वर्तन असते. त्यामुळे पती पत्नीत असंतोष निर्माण होते. प्रसंगी संघर्ष निमार्ण होते. पुरूषाने महिलांना दया, करूणा ममता, माधुर्याची मुर्ती बनवंल आणि पवित्र हा एकच तिचा धर्म असेल तो धर्म महिला स्त्रीशक्ती नावाच्या अमुर्त कल्पना चिटकवतो. पण स्त्रीयांचे स्वातत्र्य स्त्रीमुक्ती कधीच मान्य करत नाही. जगामध्ये एकूण उत्पादन देणाऱ्या भौतिक साधनांच्या तुलनेत महिला ही कुठे आहे. हे जगातील प्रत्येक पुरूषाला माहित आहे. मुळात तीला उत्पादन देणाऱ्या भौतिक साधनांची मालकी देण्याऐवजी पुरूषाने तिलाव भौतिक साधने बनवले त्यानूसार ती असेल घरातील चतुर्थश्रेणीचे काम करणारी आणि घराचा वंश वाढविणारी साजिव भौतिक साधन आणि सर्वात महत्वाचे तिने केलेल्या कोणत्याही श्रमाचे मुल्य धरले जाणार नाही अशी पुरूषवादी प्रवृत्ती आहे.

नोकरी करणाऱ्या महिलांना कुटुंब आणि नोकरी दोन्ही सांभाळावे लागते त्यामुळे त्या अत्यंत ताणतणावाखाली राहतात आई टी (IT) सारख्या क्षेत्रात नोकरीवर असलेल्या महिलांना बराच वेळ काम करावे लागते. मातृत्व ही महिलांना देणगी आहे. आणि आज सुजाण पालकत्वाची गरज आहे. त्यांचा संगोपनाच्या दर्जात कुठेही उणीव नको म्हणून झटणाऱ्या माता आहेतच नोकरी करणारी महिला जास्त समंजसपण आणि डोळसपणे लक्ष देते असे संशोधनाचे निष्कर्ष आहेत. महिला ही मानवी सजीव सृष्टीची जननी आहे. तसेच मानवाच्या उत्नतीचीही ती जननी आहे. त्यामुळे महिला शिवास पुरूष व पुरूषा शिवाय महिला राहणे शक्य नाही. वर्तमान काळात भारतीय महिलाच्या दर्जात अनेक परिवर्तने झाले.

भारतातील महिलासाठी आता जग बदलेले आहे. पुरूष वर्चस्व असलेल्या कॉपोरेट परिस्थितीत मुली यशस्वी महत्वाकांक्षा पूर्ण करत आहेत. आणि त्यांच्या अपवादात्मक व्यवस्थापकिय कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी पार्टटाईम नोकऱ्या घेत आहेत. आज आपल्या महिला कुटुंबाची कमावती बनण्यासाठी बाहेर पडल्या आहेत. भारतात ट्रेंड अजून विकसित होत असला तरी आयटी आहे. क्षेत्रा भारतातील महिलांचे वर्चस्व असलेल्या उद्योग बनलेले आहे.

प्राध्यापिका, प्राचार्य वकील, डॉक्टर, न्यायाधिश मंत्री जिल्हाधिकारी राष्ट्रपती विविध उच्च

पदावर ती कार्यरत आहे. राजकीय प्रशासकिय, संगीत, पर्वतारोहण, खेळ, समाजसुधारक अशा विविध क्षेत्रात ती नावाजलेली आहे. एकंदरीत २००१ च्या जनगणने नुसार पुरूष साक्षरता प्रमाण ७६ टक्के तर महिलाचा साक्षरता ५४ टक्के आहे. आजही महिला अर्थोत्पादनाच्या बाबतीत पुरूषाधीन नाही. आर्थिक दृष्टया स्वतंत्र व निर्भर झाल्यामुळे ती आचार—विचाराच्या दृष्टीने स्वतंत्र आहे.

महिलांना त्यांची नियुक्ती निवडता आली पाहिजे जेणे करून ते त्याच्या क्षमतेच्या जास्तीत जास्त वापर करू शकतील अशा परिस्थितीमुळे नोकरीत महिलांची नियुक्ती होते. जिथे तिची वास्तविक क्षमता ओळखल्या जात नाहीत. त्यामुळे कार्यक्षमतेचे दुष्ट वर्तुळ आणि त्याद्वारे उच्च निर्णयक्षम पदासाठी निवड न होणे. हे एक प्रकारचे संघर्षम कृत्ये आहे. भुमिकेचा संघर्ष हा एक स्वातंत्रपणे केलेल्या अनेक भुमिकां मधला संघर्षाचा परिणाम होय. आहे. या समस्येच्या मुख्य बळी कार्यरत महिला आहेत. ते त्याच्या आयुष्यात अनेक भुमिका पार पाडतात. की त्याची स्वता:ची ओळख टिकवून ठेवण्यात ते अपयशी ठरतात. त्यांची संघर्ष आणि अस्मितेची मोठी समस्या निर्माण होते.

**निष्कर्ष :**

आज एकविसाव्या शतकातील महिला उच्च शिक्षण घेउन अर्थार्जन करू लागल्या आहे. नोकरी करणाऱ्या महिला सर्व बंधने तोडून सार्वजनिक खाजगी जिवनात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या उचलत आहे. आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवत आहे. मात्र सर्व महिलांचे प्रश्न सुटले आहेत. असे म्हणता येणार नाही पण अशा अनेक समस्याना त्यांनी आपल्या कर्तृत्वाने वाचा फोडली आहे.

शाळा, काम, नातेसंबध, कुटुंब आणि मित्र यांच्या मागण्यासह अनेक भुमिका जबाबदाऱ्या व्यवस्थापित करणे आव्हानात्मक असू शकते. भुमिकेच्या संघर्षाला सामोरे जाण्यास मदत करणारी एक रणनीती म्हणजे आपल्यासाठी सर्वात महत्त्वाच्या गोष्टीना प्राधान्य देणे आणि त्या दूर करण्याचा निर्णय घेणे कौटुंबिक सामाजिक, आर्थिक शैक्षणिक अशा विविध पातळयावर भुमिका साकारतांना नोकरी करणाऱ्या माहिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. घर आणि नोकरी व्यवसायातील ताण आणि अनेक असलेल्या जबाबदाऱ्या परिणाम नौकरी करणाऱ्या महिलांच्या शारिरिक व मानसिक आजारपणास कारणीभूम ठरू शकतो. हयांचा विचार करायला हवा. गृहीणी व नौकरी करणारी महिला या दोन्ही आपल्या भुमिका साकारताना त्याचा गृहीनीच्या भुमिकेवर विपरित परिणात होणार नाही. हयाची काळजी घ्यायला हवी

**समारोप :**

महिलांना मिळणारे स्थान सत्ता अधिकार यांचा विचार करून पुरूषांच्या मनोवृतीत बदल करून महिलांपेक्षा आपण मोठे आहोत ही भावना मनातुन काढून टाकली पाहिजे महिलांनी ही मनातली भिती व संकोच काढून टाकून आपल्या हक्कांविषयी लढा दिला पाहिजे नोकरी करणाऱ्या महिलांनी आपण पुरूषांच्या बरोबरीने अर्थाजन करतो आहोत तर आपण कसल्याही बाबातीत कमी

नाही हे आपल्या मनाशी ठरवून घेतले पाहिजे.

## संदर्भ :


- Proceedings of UOC Sponspred I.N.C ( 29 Dec 2012) CWIAC ISBN No. 987-81-926241-0-5 स्त्री सक्षमिकरणाची दिशा आणि वास्तविकता प्रा. डॉ. ज्योती सुभाष सेलुकर समाजशास्त्र विभाग बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविदयालय खापरखेडा.
- World wide internation Inder Discipdinary Research Journal (A peer Reviewed Reserral Iss N-2454-7905 Issue- Lxxx viii 7 oct 2023 SJIFImpact F—8-024 P.No. 382 'स्त्रीयांची सामाजिक स्थिती' प्रा. खरांत अमोल निवृंत्ती.
- प्रा. चंद्रकात गोरक्षणात हारदे नुतन कला महाविदयालय राजापुर ता. संगमनेर जि. अहमदनगर
- 'नोकरी करणाऱ्या स्त्रीयांची समस्या' डॉ भुषण आर. मराठी विभाग यशवंत गुडधे पाटील महाविदयालय हिंगणा नागपूर WIAC Dec -2011 Proceeding of UGC sponsored P.No.36
- 'स्त्री कुटुंब आणि सताजातील योगदान' व्ही. एम .कलाडे असि.प्रोफेसर आर.आर. पटेल कॉलेज भंडारा. Proceeding of WLAC-2012 OSBN No.978-81-8926241-0-5
- 'भारतीय समाजातील महिलाची स्थिती आणि आव्हाने' ले छाया शिवाजी सौदरमल डॉ बाबासाहेब मराठवाडा विदयापिढ औरंगाबाद Vol Issue Lxxx viii 7 oct 2023 SJIF Impact Factor 8- 024- P.No. 421
- Online (JEMETEC) 'काम करणाऱ्या महिलांमध्ये भुमिका संघर्ष समस्या' Jimsgin व्दारे २ जुन 2017